## राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती

१ ) प्रस्तावना : राज्यातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेता यावे या उदात्त हेतून राज्य शासनाने शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन क्र. एससीएच-१०६५ – यु.दि. १९ सप्टेंबर, १९६५ अन्वये दक्षिणा शिष्यवृत्ती सुरु करण्यात आलेली आहे.

२ ) एकूण संस्खा: महाविद्यालयीन स्तर.

| | |
|---|---|
| १) एलफिस्टन कॉलेज, मुंबई. | ६ |
| २) विज्ञान संस्था, मुंबई. | ६ |
| ३) ईस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी, मुंबई-६०. | ४ |
| ४) सिडनहॅम महाविद्यालय, मुंबई. | ४ |
| ५) शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई. | ४ |
| ६) राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर | ६ |
| ७) विज्ञान संस्था, नागपूर. | ६ |
| ८) नागपूर महाविद्यालय, नागपूर | ६ |
| ९) विदर्भ महाविद्यालय, अमरावती. | ६ |
| १०) शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद | ६ |
| एकूण | ५४ |

विद्यापीठीय स्तर :

| | |
|---|---|
| १) मुंबई विद्यापीठ, मुंबई. | ४ |
| २) पुणे विद्यापीठ, पुणे. | ४ |
| ३) नागपूर विद्यापीठ, नागपूर | ४ |
| ४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ४ |
| ५) एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई. | २ |
| ६) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | ४ |
| एकूण | २२ |

| | |
|---|---|
| १) महाविद्यालयीन स्तर | ५४ |
| २) विद्यापीठीय स्तर | २२ |
| एकूण संच | ७६ |

३ ) राज्य शासनाची दक्षीणा अधिछात्रवृत्तीकरिता शासनाने शासन निर्णय एमसीएच २००३ (४०५/०३) मशि-१ दिनांक – ५ फ्रेब्रुवारी २००४ अन्वये खालीलप्रमाणे दरांमध्ये बदल करण्यात आलेला आहे.

पूर्वीचे दर सुधारित दर

रु. ६०/- द.म. रु. १००/- द.म.

शिष्यवृत्ती शिष्यवृत्ती

४) **दर :** पात्र विद्यार्थ्यांकरिता दरमहा रु. ६०/- प्रमाणे दोन वर्षाकरिता शिष्यवृत्ती मंजुर केली जाते. अभ्यासातील समाधानकारक प्रगती अहवालानुसार दुस-या वर्षाचे नूतनीकरण मंजूर केले जाते.

५) **पात्रता :** या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादा नाही. शासकीय विज्ञान संस्था/महाविद्यालये तसेच विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या आवेदन पत्रानुसार विहित केलेल्या मंजुर संचाच्या प्रमाणात शिष्यवृत्ती (संबंधित विद्यार्थ्यांना) मंजूर केली जाते.

६) **अर्ज कोठे मिळतात :** सर्व विद्यापीठे व महाविद्यालये यांचेकडे शिष्यवृत्तीचे फॉर्म उपलब्ध होतात.

७) **अर्ज कोणामार्फत पाठविले जातात :** संचालनालयाकडून परिपत्रके निर्गमित करून ३० सप्टेंबर, अखेर आवेदन पत्रे पाठविण्यासंबंधी विद्यापीठे/ व शासकीय महाविद्यालयांना सूचित केले जाते.

**अंतिम कार्यवाही :** प्राप्त झालेल्या आवेदन पत्राची उच्च शिक्षण संचालनालयाच्या स्तरांवर पडताळणी करून, संबंधित विद्यार्थ्यांचे नवीन मंजुरी व नूतनीकरणाचे आदेश उच्च शिक्षण संचालनालयाच्या स्तरांवर निर्गमित केले जातात.